# महाराष्ट्र शासन

# राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान

# महानगरपालिका, अमरावती

टिपणी

# २०१४

# राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान
# महानगरपालिका, अमरावती

## टिपणी

राज्यातील नागरीकरणाचा वेग झपाटयाने वाढत असुन त्यासोबतच नागरी क्षेत्रात अनेक समस्या निर्माण होत आहेत. जनगणनेच्या आकडेवारीनुसार महाराष्ट्र राज्याच्या नागरी क्षेत्रातील लोकसंख्या एकुण लोकसंख्येच्या ४५ % चे वर गेलेली असुन यात दिवसेंदिवस अधिक वाढ होत आहे. आजमितीस नागरी क्षेत्रातील एकुण लोकसंख्येपैकी साधारणतः २८ % लोक दारिद्रय रेषेखालील जिवन जगतात. वाढत्या नागरीकरणाच्या प्रक्रियेसोबतच राज्याच्या नागरी क्षेत्रातील दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येच्या प्रमाणात देखील वाढ होत आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे नागरी क्षेत्रात होणारे स्थलांतर होय.

महाराष्ट्र राज्य हे कल्याणकारी राज्य असल्याने समाजातील दुर्बल घटकांच्या विकासासाठी त्यांना दारिद्रय रेषेच्या वर आणुन त्यांच्या जिवनमानाचा स्तर उंचावण्यासाठी शासनाद्वारे विविध योजना राबविल्या जातात. शिवाय ७४ व्या घटना दुरुस्ती नुसार शिक्षण, आरोग्य याप्रमाणेच नागरी क्षेत्रातील दारिद्रय निवारण करणे हे देखील स्थानिक स्वराज्य संस्थाचे बंधनकारक कर्तव्य झालेले आहे. त्यामुळे केंद्र शासनाद्वारे देखील राज्यांच्या मदतीने क्षेत्रातील दारिद्रय निवारणासाठी ठोस योजना राबविल्या जातात.सुरुवातीला नेहरु रोजगार योजना (NRY), नागरी गरीबांसाठी मुलभुत सेवा योजना (UBSP), मा. पंतप्रधान एकात्मिक दारिद्रय निवारण कार्यक्रम (PMIUPEP) या योजना राबविल्या जात होत्या.

पुढे या योजना बंद करुन सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना दि. १/१२/१९९७ पासुन राज्याच्या सर्व नागरी क्षेत्रात राबविली जाते. दारिद्रय रेषेखालील व्यक्तींना कौशल्य प्रशिक्षण देवुन त्यांना रोजगार / स्वयंरोजगार मिळविण्यासाठी सक्षम करणे व दारिद्रय रेषेखालील महिलांना बचत गटाचे माध्यमातुन संघटीत करुन व्यवसायाच्या संधी उपलब्ध करुन देणे हे या योजनेचे दोन प्रमुख उद्देश आहेत. केंद्र शासनाने या योजनेच्या सुधारीत मार्गदर्शक सुचना लागु केल्यानुसार एप्रिल २००९ पासुन काही घटकांत बदल करण्यात आलेले आहे. राष्ट्रीय कौशल्य विकास धोरणाशी सांगड घालुन दारिद्रय रेषेखालील व्यक्तींना कौशल्य प्रशिक्षण देवुन त्यांचे आर्थिक स्वावलंबन घडवुन आणण्याचे काम या योजनेद्वारे करण्यात आलेले आहे.

१२ व्या पंचवार्षिक योजनेच्या अभ्यासगटाने केलेल्या शिफारशी नुसार केंद्र शासनाने सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेच्या जागी,आता राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (National Urban Livelihoods Mission) राबविण्याचा निर्णय घेतलेला आहे.

त्यानुसार राज्यात देखील नागरी क्षेत्रासाठी संवुर्ण जयंती शहरी रोजगार योजने ऐवजी राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान लागु करावयाची कार्यचाही सुरु आहे. या अभियानाचे घटक व संक्षिप्त स्वरुपात माहिती खालीलप्रमाणे आहे.

**१) लक्ष निर्धारण**

**शहर व समुदाय ः-**

**अ) शहर -**

सन २०११ चे जनगणनेनुसार १ लक्ष पेक्षा जास्त लोकसंख्या असलेली शहरे (एकुण-४४)

सन २०११ चे जनगणनेनुसार १ लक्ष कमी लोकसंख्या परंतु जिल्हा मुख्यालय असलेली शहरे (एकुण - ०९)

पहिल्या टप्प्यात महाराष्ट्र राज्यातील एकुण ५३ शहरांचा समावेश करण्यात आलेला आहे.

**ब) समुदाय ः-**

शहरी गरीब, शहरी बेघर कुटुंब

सामाजिक आर्थीक जातीनिहाय जनगणना २०११ (SECC) नुसार निश्चीत करण्यात आलेले सेवार्थी.

SECC ची आकडेवारी निश्चीत होईपर्यंत सद्याच्या दारिद्रय रेषेखालील (BPL) यादीतील कुटुंबे.

राज्यातील सद्याची एकुण BPL कुटुंब संख्या १५,२०,६६७, अमरावती महानगरपालिका ३०२२६ बी.पी.एल कुटुंब

**अभियानाचे प्रमुख घटक**

१) Social Mobilisation & Institution Development (SM & ID)

**सामाजिक अभिसरण व संस्थात्मक बांधणी (विकास)**

अभियानाच्या या घटकां अंतर्गत शहरी गरीब कुटुंबातील किमान एक महिला या प्रमाणे सर्व महिलांचा कालबध्दरित्या महिला स्वयंसहाय समुहात (SHG) समावेश करणे, साधारणतः एका वार्डातील / प्रभागातील सर्व SHG मिळुन एका संघाची (Area Level Federation ) निर्मीती करणे, शहर पातळीवरील सर्व Area Level Federation चे महासंघात (City Level Fedration) रुपांतरण करणे, संघ व महासंघ नोंदणीकृत करणे इ. काम करावयाची असुन या संघाच्या (ALF) च्या विकासासाठी रु. ५०,०००/- ची तरतुद करण्यात आलेली आहे. शिवाय बचत गटांची स्थापना, क्षमता बांधणी, बँक लिंकेज इ. साठी एका Resource Organization ची तरतुद करण्यात आलेली आहे. अभियाना अंतर्गत स्थापित महिला बचत गटांनारु.१०,०००/- प्रति गट याप्रमाणे फिरता निधी देण्यात येईल. सर्व शहरी गरीबांना बँकींग सेवा उपलब्ध करुन देणे, विमा योजनेचा लाभ देणे आदी बाबी Universal Financial Inclusion अंतर्गत समाविष्ट आहेत. शहरी गरीब व त्यांच्या गटांनी तयार केलेल्या मालाला बाजारपेठ मिळवुन देण्यासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात १ ते ८ City Livelihood Center (CLC) स्थापन करण्याची तरतुद असुन यासाठी रु. १० लक्ष प्रमाणे आर्थीक मदत देता येईल.

२) Capacity Building & Training (CB&T) **क्षमता बांधणी व प्रशिक्षण**

या घटकां अंतर्गत अभियानाचे अंमलबजावणीसाठी मनुष्यबळाची तरतुद करुन देण्यात आलेली आहे. यात राज्य अभियान व्यवस्थापन कक्षासाठी ६ तज्ञ व्यक्ती, शहर अभियान व्यवस्थापन कक्षासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात २ ते ४ तज्ञ व्यक्ती तर ३००० दारिद्रय रेषेखालील कुटुंब संख्येमागे एक समुदाय संघटक याप्रमाणे तरतुद आहे.

३) Employment Through Skill Training & Placement (EST&P)

**कौशल्य प्रशिक्षणाद्वारे स्वयंरोजगाराची उपलब्धता**

अभियानाच्या या घटकां अंतर्गत लाभार्थ्यांना स्वयंरोजगारांच्या उपलब्धतेसाठी कौशल्य प्रशिक्षण देण्यात येईल. सद्या देखील या पध्दतीचे कौशल्य प्रशिक्षण शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थे मार्फत देण्यात येते.

४) Self Employment Programme (SEP) **स्वयंरोजगार कार्यक्रम**

लाभार्थ्यांना वैयक्तीक किंवा सामुहिकरित्या उद्योग व्यवसायासाठी बँके मार्फत वित्तीय सहाय देण्यात येईल. ज्यात वैयक्तीक स्वयंरोजगारासाठी रु. २ लक्ष पर्यंत तर सामुहिक स्वयंरोजगार / व्यवसायासाठी रु. १० लक्ष पर्यंत बँके मार्फत सहाय करण्याची तरतुद आहे. सद्या सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत वैयक्तीक स्वयंरोजगारासाठी २५ % तर सामुहिक व्यवसायासाठी बचत गटांना ३५ % अनुदान देण्यात येते. याप्रमाणे या अभियानात रोख अनुदानाची तरतुद नाही. मात्र बँकेच्या व्याज दरावरील ७ % पेक्षा अधिक व्याजाची रक्कम अनुदान म्हणुन देय करण्यात येईल. विहीत कालावधीत समाधानकारकरित्या कर्ज परतफेड करणा-या SHG ला ३ % इतकी व्याजदरात अतिरीक्त सवलत देण्याची देखील तरतुद आहे. याशिवाय या घटकां अंतर्गत Credit Card तसेच तंत्रज्ञान, बाजारपेठ व इतर सहाय, लघु व्यवसायासाठी Branding, Packaging, Marketing आदींसाठी सहाय केले जाईल.

५) *Support to Urban Street Vendors* **फेरीवाल्यांना सहाय**

अभियानाच्या या घटकां अंतर्गत Street Vendor चे सर्वेक्षणव डाटाबेस तयार करणे, Street Vendor ना ओळखपत्र देणे, शहर स्तरावर त्यांचे विकासासाठी आराखडा तयार करणे, Street Vendor साठी बाजारपेठ विकसीत करणे, सर्व Street Vendor चे बचत खाते उघडणे तसेच राष्ट्रीय स्वास्थ विमा योजना सारख्या योजनांशी सांगड घालुन सर्व Street Vendor ना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याचे काम देखील या घटकां अंतर्गत करावयाचे आहे.

६) *Scheme of Shelter for Urban Homeless (SUH)* **शहरी बेघंराना निवारा**

अभियानाच्या या घटकां अंतर्गत १ लक्ष लोकसंख्येसाठी एका निवा-याची तरतुद असुन हे निवारे प्रामुख्याने रेल्वे स्टेशन, बस स्टँन्ड, प्रमुख् बाजारपेठ आदी प्रमुख ठिकाणी निर्माण करावयाचे आहे. निवारा बांधण्यासाठीची जागा शासनाने उपलब्ध करुन द्यावयाची असुन बांधकाम व व्यवस्थापन यासाठी ७५::२५ या प्रमाणात केंद्र व राज्याचा निधी उपलब्ध करुन देण्यात ओलला आहे. या निवा-यांचे परिचलन व व्यवस्थापनासाठी देखील स्वतंत्र मनुष्यबळाची तरतुद करण्यात आलेली आहे. या निवा-यांच्या देखरेख व व्यवस्थापनासाठी स्थानिक स्तरावर एक Shelter Management Committee स्थापीत करावयाची आहे.

Administration And Other Expenses (A & OE) या अंतर्गत कार्यक्रम सनियंत्रण, MIS विकसन, Data Base तसेच e- tracking व मुल्यांकन तथा इतर उपक्रम आदी बाबींवर एकुण खर्चाच्या 20 % इतकी तरतुद आहे. तसेच Information, Education And Communication (IEC) साठी एकुण तरतुदीच्या ३ % इतकी रक्कम राखुन ठेवली आहे.

*NULM Administration* **अभियानाचे व्यवस्थापन**

स्थानिक स्तरावर सबंधीत महानगरपालिकांचे आयुक्त / नगर परिषदांचे मुख्याधिकारी यांचे प्रमुखतेत शहर अभियान व्यवस्थापन कक्षाचे गठन करावयाचे आहे.

**राज्यात अभियानाची अंमलबजावणी -**

राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाची राज्यामध्ये अंमलबजावणी करण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन असुन त्यामध्ये खालील प्रमुख बाबींचा समावेश आहे.

- केंन्द्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये जिल्हास्तरीय कक्षाचा अंतर्भाव नाही,परंतु अभियानाच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय कक्षाची गरज लक्षात **घेवुन जिल्हा प्रकल्प अधिकारी / जिल्हा प्रशासन अधिकारी यांना सहायक म्हणुन एका जिल्हा संनियंत्रण अधिका-याचे पद निर्माण करण्यात आले.**
- जिल्हास्तरीय कक्षातुन जिल्यातील संपुर्ण महानगरपालिका व नगरपरिषदांच्या शहरी दारिद्रय कक्षाचे रुपांतरण शहरी अभियान **व्यवस्थापन कक्षामध्ये** (City Mission Management Unit) **करणे.**
- **सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत महानगरपालिका व नगरपरिषदांमध्ये कार्यरत प्रकल्प संचालक / अधिकारी व समुह संघटकांना अभियाना अंतर्गत सहायक प्रकल्प अधिकारी व समुदाय संघटक म्हणुन कार्यरत करण्यात आले.**
- सदर विभागावर मा. आयुक्त यांचे निर्देश्याने कार्यरत असुन जिल्हाधिका-याचे नियंत्रण सुध्दा राहणार आहे. तरी सदर विभाग स्वतंत्र कक्ष म्हणुन अमंलबजावणी करण्याचे कार्य करतो.

**योजनेचे नियोजन -**

- सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत स्थापित महिला स्वयंसहाय समुहांचा (SHG) आढावा घेवुन उर्वरीत महिलांना या समुहांमध्ये सामावुन घेण्याचा कालबध्द **कार्यक्रम ठरविण्यात आला असुन तसे कार्य सुरु केले आहेत.**
- या महिला स्वयंसहाय समुहांचे Area level Federation व् Town Level Federation मध्ये बांधणी करणे.
- स्थानिक स्तरावर महिला स्वयंसहाय समुहांची स्थापना व क्षमता वृध्दीसाठी Resource Organization ची नेमणुक करणे.
- राष्ट्रीय कौशल्य विकास धोरणाशी सांगड घालुन SET & P या घटकाची अमंलबजावणी करणे.
- सद्दःस्थितीत उद्दीष्टय प्राप्त झालेले नाही व निधी सुध्दा प्राप्त नाही त्यामुळे वरीलप्रमाणे नियोजना नुसार कार्य सुरु आहे.

# कार्याचे प्रभाग निहाय नियोजन

दि. 1/11/2014

राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत क्षेत्रिय कार्याकरीता समुदाय संघटकांना झोन निहाय प्रभागाचे वाटप करुन क्षेत्र विभागणी पुढील प्रमाणे.

ती. प्रतिभा इंगळे, स. सं.

| झोन क्र. १ | |
|---|---|
| प्रभाग क्र. व नाव | BPL |
| १ - शेगाव | १२७ |
| २ - तपोवन | ४८५ |
| ३- जवाहर स्टेडीयम | २१६ |
| ४- संत गाडगेबाबा | ४१० |
| ५- रामपुरी कॅम्प | १३८ |
| ६- विदर्भ महाविद्यालय | ७७५ |
| ७- नवसारी | ४६६ |
| ९- महेंद्र कॉलनी | २६५ |
| १०- विलास नगर | ८८६ |
| | ३७६८ |

श्रीमती. सुषमा किनगावकर, स.सं.

| झोन क्र. २ | | |
|---|---|---|
| अ.क्र | प्रभाग क्र. व नाव | BPL |
| १ | ११ - मोरबाग | ३७२ |
| २ | १२ - अंबापेठ | ५१ |
| ३ | १३ - मालटेकडी | १९१ |
| ४ | १९ - स्वामी विवेकानंद | ७७५ |
| ५ | २० - अंबिका नगर | २३७ |
| ६ | २१ - राजापेठ | २७३ |
| ७ | २२ - शारदा नगर | २९० |
| ८ | २३ - गोरक्षण | ४३९ |
| ९ | २६ - गवळीपुरा | १०७९ |
| १० | २४ - बुधवारा | ७१४ |
| | २५ - जवाहर गेट | ८३५ |
| | ३१ - गडगडेश्वर | २४५७ |
| एकुण | | ७७१३ |

श्रीमती. उज्वला मेश्राम, स.सं.

| झोन क्र. ३ | | |
|---|---|---|
| अ.क्र. | प्रभाग क्र. व नाव | BPL |
| १ | १४ - एसआरपीएफ | १२९ |
| २ | १५ - वडाळी | ४६० |
| ३ | १६ - चपराशी पुरा | ४१६ |
| ४ | १७ - फ्रेजरपुरा | १२१ |
| ५ | १८ - रुख्मीनी नगर | ५०६ |
| ६ | ३४ - किरण नगर | ८८९ |
| ७ | ३५ - वडरपुरा | ६०० |
| ८ | ३६ - बेनोडा | ३५६ |
| एकुण | | ३४७७ |

श्रीमती. मिना वर्धेकर, स.सं.

| झोन क्र. ४ | | |
|---|---|---|
| अ.क्र | प्रभाग क्र. व नाव | BPL |
| १ | ३२ - नवाथे प्लॉट | ५९४ |
| २ | ३३ - दस्तुर नगर | ७७ |
| ३ | ३७ - जेवड नगर | १०५१ |
| ४ | ३८ - अकोली | ३८८ |
| ५ | ३९ - नेमाणी गोडाऊन | १०१५ |
| ६ | ४० - अलमास नगर | ५५५ |
| ७ | ४१ - बारीपुरा | १५०९ |
| ८ | ४२ - सोमवार बाजार | १३७३ |
| ९ | ४३ - झिरी | ११०७ |
| एकुण | | ७६६९ |

श्रीमती. छाया खंडारे, स.सं.

| झोन क्र. ५ | | |
|---|---|---|
| अ.क्र. | प्रभाग क्र. व नाव | BPL |
| १ | ८ - जमील कॉलनी | २०५८ |
| २ | २७ - पठाणपुरा | १४८१ |
| ३ | २८ - मेहंदीया कॉलनी | ९७१ |
| ४ | २९ - अलीम नगर | १२९७ |
| ५ | ३० - रहमत नगर | १७९२ |
| एकुण | | ७५९९ |

सहपत्र :- प्रभाग निहाय दैनंदिनीचे कार्य करण्याबाबत नियोजन सोबत संलग्न.

आयुक्त
महानगरपालिका, अमरावती.

प्रत :-
मा. महापौर, मनपा अम. यांना माहितीस सादर.
मा. उपमहापौर,मनपा अम. यांना माहितीस सादर.
मा. स्थायी समिती सभापती,मनपा अम यांना माहितीस सादर.
मा. पक्षनेता, मनपा अम. यांना माहितीस सादर.
मा. गटनेता (सर्व),मनपा अम. यांना माहितीस सादर.
मा. सर्वपदाधिकारी,मनपा अम. यांना माहितीस सादर.

## समुदाय संघटकाकरीता मासिक क्षेत्रिय कार्याचे प्रभाग निहाय नियोजन.

### कालावधी :- माहे नोव्हेंबर २०१४ ते ऑगस्ट २०१६ पर्यंत

राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अमंलबजावणी करीता बचत गटा सोबत प्रत्यक्ष प्रभागात संपर्क करुन गटाचे कार्याचे व्यवस्थापना करीता माहेवारी प्रभाग निहाय नियोजन आराखडा.

| तारीख | समुदाय संघटकाचे नाव | प्रभाग क्र. | वेळ |
|---|---|---|---|
| | श्रीमती. प्रतिभा इंगळे, | युनिट क्र.१, झोन क्र. १ | कार्यालयीन वेळ |
| १०/११/१४ ते ११/११/१४ | --------------,,------------ | १ | |
| १२/११/१४ ते १३/११/१४ | --------------,,------------ | २ | |
| १४/११/१४ ते १५/११/१४ | --------------,,------------ | ३ | |
| १७/११/१४ ते १८/११/१४ | --------------,,------------ | ४ | |
| १९/११/१४ ते २०/११/१४ | --------------,,------------ | ५ | |
| २१/११/१४ ते २२/११/१४ | --------------,,------------ | ६ | |
| २४/११/१४ ते २५/११/१४ | --------------,,------------ | ७ | |
| २६/११/१४ ते २७/११/१४ | --------------,,------------ | ८ | |
| २८/११/१४ ते २९/११/१४ | --------------,,------------ | ९ | |
| ३०/११/१४ ते ३१/११/१४ | --------------,,------------ | १० | |

वरीलप्रमाणे प्रभाग निहाय बचत गटाचे कार्य करुन पहिल्या व तिस-या शनिवारी सहायक प्रकल्प अधिकारी सोबत झालेल्या कार्याचे चर्चा व नियोजन अहवाल सादरीकरण व कार्यालयीन कामकाज तसेच पहिला व तिसरा शुक्रवार झोन निहाय कार्यालयीन कार्य करणे.

[signature] 8/10/014

आयुक्त

महानगरपालिका, अमरावती.

समुदाय संघटकाकरीता मासिक क्षेत्रिय कार्याचे प्रभाग निहाय नियोजन.

कालावधी :- माहे नोव्हेंबर २०१४ ते ऑगस्ट २०१६ पर्यंत

राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अमंलबजावणी करीता बचत गटा सोबत प्रत्यक्ष प्रभागात संपर्क करुन गटाचे कार्याचे व्यवस्थापना करीता माहेवारी प्रभाग निहाय नियोजन आराखडा.

| तारीख | समुदाय संघटकाचे नाव | प्रभाग क्र. | वेळ |
|---|---|---|---|
| | श्रीमती. सुषमा किनगावकर | युनिट क्र. , झोन क्र. २ | कार्यालयीन वेळ |
| १०/११/१४ ते ११/११/१४ | --------------,,------------ | ११ | |
| १२/११/१४ ते १३/११/१४ | --------------,,------------ | १२ | |
| १४/११/१४ ते १५/११/१४ | --------------,,------------ | १३ | |
| १७/११/१४ ते १८/११/१४ | --------------,,------------ | १९ | |
| १९/११/१४ ते २०/११/१४ | --------------,,------------ | २० | |
| २१/११/१४ ते २२/११/१४ | --------------,,------------ | २१ | |
| २४/११/१४ ते २५/११/१४ | --------------,,------------ | २२ | |
| २६/११/१४ ते २७/११/१४ | --------------,,------------ | २३ | |
| २८/११/१४ ते २९/११/१४ | --------------,,------------ | २६ | |
| ३०/११/१४ ते ३१/११/१४ | --------------,,------------ | २४, २५, ३१ | |

वरीलप्रमाणे प्रभाग निहाय बचत गटाचे कार्य करुन पहिल्या व तिस-या शनिवारी सहायक प्रकल्प अधिकारी सोबत झालेल्या कार्याचे चर्चा व नियोजन अहवाल सादरीकरण व कार्यालयीन कामकाज तसेच पहिला व तिसरा शुक्रवार झोन निहाय कार्यालयीन कार्य करणे.

आयुक्त

महानगरपालिका, अमरावती.

समुदाय संघटकाकरीता मासिक क्षेत्रिय कार्याचे प्रभाग निहाय नियोजन.

**कालावधी ::- माहे नोव्हेंबर २०१४ ते ऑगस्ट २०१६ पर्यंत**

राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अमंलबजावणी करीता बचत गटा सोबत प्रत्यक्ष प्रभागात संपर्क करुन गटाचे कार्याचे व्यवस्थापना करीता माहेवारी प्रभाग निहाय नियोजन आराखडा.

| तारीख | समुदाय संघटकाचे नाव | प्रभाग क्र. | वेळ |
|---|---|---|---|
| | श्रीमती. छाया खंडारे | युनिट क्र. , झोन क्र. ५ | कार्यालयीन वेळ |
| १०/११/१४ ते ११/११/१४ | --------------,,------------ | ८ | |
| १२/११/१४ ते १३/११/१४ | --------------,,------------ | २७ | |
| १४/११/१४ ते १५/११/१४ | --------------,,------------ | २८ | |
| १७/११/१४ ते १८/११/१४ | --------------,,------------ | २९ | |
| १९/११/१४ ते २०/११/१४ | --------------,,------------ | ३० | |
| २१/११/१४ ते २२/११/१४ | --------------,,------------ | | |
| २४/११/१४ ते २५/११/१४ | --------------,,------------ | | |
| २६/११/१४ ते २७/११/१४ | --------------,,------------ | | |
| २८/११/१४ ते २९/११/१४ | --------------,,------------ | | |
| ३०/११/१४ ते ३१/११/१४ | --------------,,------------ | | |

वरीलप्रमाणे प्रभाग निहाय बचत गटाचे कार्य करुन पहिल्या व तिस-या शनिवारी सहायक प्रकल्प अधिकारी सोबत झालेल्या कार्याचे चर्चा व नियोजन अहवाल सादरीकरण व कार्यालयीन कामकाज तसेच पहिला व तिसरा शुक्रवार झोन निहाय कार्यालयीन कार्य करणे.

## समुदाय संघटकाकरीता मासिक क्षेत्रिय कार्याचे प्रभाग निहाय नियोजन.

### कालावधी :- माहे नोव्हेंबर २०१४ ते ऑगस्ट २०१६ पर्यंत

राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अमंलबजावणी करीता बचत गटा सोबत प्रत्यक्ष प्रभागात संपर्क करुन गटाचे कार्याचे व्यवस्थापना करीता माहेवारी प्रभाग निहाय नियोजन आराखडा.

| तारीख | समुदाय संघटकाचे नाव | प्रभाग क्र. | वेळ |
|---|---|---|---|
| | श्रीमती. मिना वर्धेकर | युनिट क्र. , झोन क्र. ४ | कार्यालयीन वेळ |
| १०/११/१४ ते ११/११/१४ | --------------,,------------ | ३२ | |
| १२/११/१४ ते १३/११/१४ | --------------,,------------ | ३३ | |
| १४/११/१४ ते १५/११/१४ | --------------,,------------ | ३७ | |
| १७/११/१४ ते १८/११/१४ | --------------,,------------ | ३८ | |
| १९/११/१४ ते २०/११/१४ | --------------,,------------ | ३९ | |
| २१/११/१४ ते २२/११/१४ | --------------,,------------ | ४० | |
| २४/११/१४ ते २५/११/१४ | --------------,,------------ | ४१ | |
| २६/११/१४ ते २७/११/१४ | --------------,,------------ | ४२ | |
| २८/११/१४ ते २९/११/१४ | --------------,,------------ | ४३ | |
| ३०/११/१४ ते ३१/११/१४ | --------------,,------------ | | |

वरीलप्रमाणे प्रभाग निहाय बचत गटाचे कार्य करुन पहिल्या व तिस-या शनिवारी सहायक प्रकल्प अधिकारी सोबत झालेल्या कार्याचे चर्चा व नियोजन अहवाल सादरीकरण व कार्यालयीन कामकाज तसेच पहिला व तिसरा शुक्रवार झोन निहाय कार्यालयीन कार्य करणे.

आयुक्त

समुदाय संघटकांकरीता मासिक क्षेत्रिय कार्याचे प्रभाग निहाय नियोजन.

**कालावधी ः- माहे नोव्हेंबर २०१४ ते ऑगस्ट २०१६ पर्यंत**

राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अमंलबजावणी करीता बचत गटा सोबत प्रत्यक्ष प्रभागात संपर्क करुन गटाचे कार्याचे व्यवस्थापना करीता माहेवारी प्रभाग निहाय नियोजन आराखडा.

| तारीख | समुदाय संघटकाचे नाव | प्रभाग क्र. | वेळ |
|---|---|---|---|
| | श्रीमती. उज्वला मेश्राम | युनिट क्र. , झोन क्र. ३ | कार्यालयीन वेळ |
| १०/११/१४ ते ११/११/१४ | -------------,,----------- | १४ | |
| १२/११/१४ ते १३/११/१४ | -------------,,----------- | १५ | |
| १४/११/१४ ते १५/११/१४ | -------------,,----------- | १६ | |
| १७/११/१४ ते १८/११/१४ | -------------,,----------- | १७ | |
| १९/११/१४ ते २०/११/१४ | -------------,,----------- | १८ | |
| २१/११/१४ ते २२/११/१४ | -------------,,----------- | ३४ | |
| २४/११/१४ ते २५/११/१४ | -------------,,----------- | ३५ | |
| २६/११/१४ ते २७/११/१४ | -------------,,----------- | ३६ | |
| २८/११/१४ ते २९/११/१४ | -------------,,----------- | | |
| ३०/११/१४ ते ३१/११/१४ | -------------,,----------- | | |

वरीलप्रमाणे प्रभाग निहाय बचत गटाचे कार्य करुन पहिल्या व तिस-या शनिवारी सहायक प्रकल्प अधिकारी सोबत झालेल्या कार्याचे चर्चा व नियोजन अहवाल सादरीकरण व कार्यालयीन कामकाज तसेच पहिला व तिसरा शुक्रवार झोन निहाय कार्यालयीन कार्य करणे.

२०/११/२०१४

आयुक्त

महानगरपालिका, अमरावती.